# भाषेचे स्वरूप व कार्य

प्रा. सविता तांबे

(मराठी विभाग )

सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला ,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर

तृतीय  वर्ष कला, मराठी - प्रथम सत्र

भाषाविज्ञान -वर्णनात्मक व ऐतिहासिक

# भाषेचे स्वरूप व कार्य

- भाषेचे स्वरूप
- प्रस्तावना

मानवाचा विकास भाषा ,चक्र व अग्नी यांच्या शोधामुळे झाला. त्यामुळे भाषा हि मानवाला मिळालेली श्रेष्ठ देणगी आहे . समाज व भाषा ह्या परस्परावलंबी असतात .भाषा हे विचार, भाषण यांचा विनिमयाचे साधन आहे .हजारो मैल असणाऱ्या माणसांशी आपण भाषेमुळे संपर्क करू शकतो. मानवाच्या प्रगतीमध्ये भाषेचा प्रमुख वाटा आहे . भाषा हि समाज व संस्कृतीला व्यापून राहिलेली आहे. भाषा ही दुधारी शस्त्र आहे . भाषा हे दैनदिन यावहाराचे मुलभूत साधन आहे. जि लिहिली जाते ,ती भाषा नाही , बोलली जाते ती भाषा .

# भाषा ही एक अर्जित वस्तू

- भाषा ही दैवी देणगी किंवा किमया नसून ती मानवाला अर्जित करावी लागते.
- भाषा ही नैसर्गिक सहजप्रेरणा आहे. भाषा ही समाजाची निर्मिती आहे .
- भाषा समाजामध्ये विकसित होते.भाषा मानवाला जन्मता किंवा उपजत नसते. विशिष्ठ वयामध्ये ती कार्यान्वित होते.
- मानव भाषा ही ऐकून ऐकून शिकतो . त्यामुळे भाषा ही अर्जित आहे . ती समाजामध्ये राहून शिकावी लागते .
- प्रसारमाध्यमांचा असंख्य वापर या कारणांमुळे समाजजीवन बदलत चालले आहे. त्यामुळे समाज बदलतो, तशी भाषा बदलते.
- बदलत्या समाज जीवनाबरोबर भाषा अविरत बदलत असते याला भाषा विकसित होते असे म्हटले जाते .

# भाषेच्या व्याख्या

**भाषेच्या अभ्यासकांनी  भाषा म्हणजे काय ? हे खालीलपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.**

१) **डॉ. ना.गो . कालेलकर** -

ज्या ध्वनिसंकेताचा पद्धतशीर वापर करून प्रत्येक व्यक्ती व्यवहारात भाग घेते, ते व्यवहार क्षम संकेत म्हणजे भाषा होय.

२) **वा. गो . आपटे**

मनांची कल्पना शब्दांद्वारे बाहेर प्रकटण्याची साधन म्हणजे भाषा होय.

३) **भालचंद्र नेमाडे**

खास मानवी संदेशवनाची व्यवस्था म्हणजे भाषा होय.

४) **एडवर्ड सपीर**

कल्पना ,भावना ,इच्छा दुसऱ्याला सांगण्याचे , स्वताच्या इच्छेवर अवलंबून असणारे साधन म्हणजे भाषा होय.

# माणूस आणि त्याची भाषा

- भाषा हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात माणूस कोणती तरी भाषा वापरत असतो.
- आपली कल्पना व्यक्त कराण्यासाठी मानवाला भाषेची गरज आहे.
- ज्याला भाषा अवगत नाही ,असा माणूस पृथ्वीतलावर उपलब्ध नाही से म्हणता येईल .
- माणूस समाजात राहतो, त्यामुळे त्यला भाषेची नितांत आवश्यकता असते.
- एकमेकांशी संपर्क साधने , एकमेकांशी विनिमय साधने, निरनिराळया असंख्य संदेशांची देवाणघेवाण करणे भाषेद्वारे शक्य होते.
- त्यामुळे संज्ञापन हे भाषेचे मुख्य साधन आहे.

# भाषेबाबतच्या गैरसमजुती

- भाषेचा अभ्यास करायचा म्हणजे तिच्या लिखित स्वरूपाचा अभ्यास करावयाचा असतो हा एक गैरसमज आहे.
- भाषेबाबत दुसरा गैरसमज म्हणजे साहित्याला आपण भाषा समजतो .
- आर्थिक, राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक प्रतिष्टीत लोकांचा वर्ग हा समाजावर वर्चस्व गाजवून असतो हा एक गैरसमज आहे.
- भाषा म्हणजे व्याकरण अशी एक गैरसमजूत असते.
- समाजातील श्रेष्ठ - कनिष्ठ या तत्वांवर भाषेचा निकष लावणे ,अशी गैरसमजूत झाली आहे.

# भाषा -एक संकेत प्रणाली

- भाषा ही अनेक तऱ्हेने वापरली जाते. स्त्रियांची भाषा, पुरुषांची भाषा, लहान मुलांची भाषा, हावभावाची भाषा , प्राण्यांची भाषा सिग्नलची भाषा या सर्व ठिकाणी भाषेचे संकेत वापरले जातात. म्हणून भाषा ही एक संकेत प्रणाली आहे.
- मनातील आशय दुसऱ्यापर्यंत पोहचवणे यासाठी माध्यम व संकेत प्रणालीची गरज आहे.
- उदा. धोका - लाल रंग धोक्याचा संकेत देतो.
- अशा संकेतांना समाजाची मान्यता असते.
- भाषा ही संकेत व्यवस्था असून ध्वनिसंकेत आहे.

# भाषेची प्रक्रिया

- आपण जेव्हा एखादी परकीय भाषा ऐकतो, तेव्हा आपल्याला फक्त ध्वनी ऐकू येतो. पण जेव्हा मातृभाषा ऐकतो, तेव्हा आपल्याला भाषेचा आशय समजतो.
- याचा अर्थ असा कि भाषा ही ध्वनी रूप असते .
- सुरवातीला आपण भाषेती ध्वनी स्वीकारतो .ध्वनीच्या स्वीकृतीपासून आशयाच्या स्वीकृतीपर्यंत पोहोचतो.
- मानवी मुखावाटे बाहेर येणारा ध्वनी हा भाषेचा आरंभ बिंदू होय.
- आपण परभाषा शिकत असतो, तेव्हा भाषा संकेत शिकत असतो.

# भाषेची संप्रेषण प्रक्रिया

- सम्प्रेषक - आपला आशय कळविणारा
- संप्रेषण- ज्याचे संप्रेषण करायचे आहे असा आशय.
- ग्राहक- साम्प्रेशी आशय स्वीकारणारा

या तीन घटकांवर भाषा प्रक्रीयाचे संदेशवहन होते.

# भाषेची लक्षणे /वैशिष्टे

जगातील कोणत्याही दोन भाषा एकसारख्या नाहीत . परंतु भाषेची प्रक्रिया होते, ती एकसारखीच असते. त्याआधारे होकेट या भाषा विद्वानाने खालील लक्षणे सांगितली आहेत.

१) **द्विस्तरीय रचना** -भाषेची रचना दोन स्तरात आहे -

- मुल ध्वनीचा मर्यादित साठा
- मुल ध्वनीचा वेगवेगळया रचना करून तयार केलेले अगणित अर्थ

२) **निर्मितीशीलता** -भाषेच्या निर्मितीशिलतेमुळे भाषेची विनिमायक्षमता अमर्याद झाली आहे .

३) **यादृच्छिकता** -यामुळे जुने संकेत भाषीक टाकून नवे निर्माण होतात . भाषा विकसित होते .

# भाषेची लक्षणे /वैशिष्ठे

४) **अदलाबदल-**

यामुळे मानवाला अनुकरणाने कोणतीही भाषा सहज शिकणे शक्य होते.
मानवी भाषेतील नवनिर्मित रचन सहज पचनी पडतात .

५) **विशिष्टता**

या गुणधर्मामुळे मानवाच्या कार्याशक्तीत बचत होते .

६) **स्थलकालातीतता-**

मानवी भाषा ही स्थल आणि काळ यांनी बद्ध नसते.

७) संस्कृतिक **संक्रमण** -

भाषेचा वारसा ,भाषेची परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातो .संस्कृती संवर्धन करणे व एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संस्कृती संक्रमण करणे ही भाषेची मुख्य क्षमता आहे .